नि.फौ.ख. क्रमांक.२१४/२०२४
सरकार विरुध्द माधव व इतर
निशाणी क्रमांक – ३६.

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.०३</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की -
माझे नांव – विलास सोपानराव कांबळे,
वय -५४ वर्षे, धंदा -मजुरी,
रा. धसवाडी, ता.अहमदपूर जि.लातूर.

**<u>शपथेवर सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्रीमती ए.एन. काकडे.</u>**

**०१.** मी आरोपींना ओळखतो. आरोपी न्यायालयात हजर आहेत. फिर्यादी माझी भावजई आहे. आरोपी व फिर्यादीच्या दरम्यान काय घटना झाली याबाबत मला कोणतेही माहिती नाही.

**साक्षीदार अभियोगपक्षास मदत करीत नसल्यामुळे सरकारी वकीलांच्या विनंतीवरुन साक्षीदार हा सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली.**

**०२.** हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १४/०४/२०२४ रोजी दुपारी २.०० वाजता भांडनाचा आवाज आल्यानंतर मी घरातून बाहेर आलो. हे म्हणणे खरे नाही की, मी पाहिले की, आरोपी पुतणीचे लग्न का मोडले या कारणावरुन शिवीगाळ करुन मारहान करत होते व जिवे मारण्याची धमकी देत होते. हे म्हणणे खरे नाही की, मी, रणजिंत वाघमारे व गावातील इतर लाकांनी हे भांडन सोडविले होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माधवने दगडाने मारुन फिर्यादी वर्षा हिला जखमी केले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझे टिपन माझे सांगण्याप्रमाणे नोंदविले होते. आता मला जबाबातील अधोरेखीत भाग अ वाचुन दाखविला त्यातील मजकुर माझ्या सांगण्याप्रमाणे नोंदविलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींना वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

सरतपास पुर्ण.

**<u>आरोपींतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री.एन.एन.देमगुंडे यांच्यामार्फत सुरु</u>:-**

**०३.** उलटतपास नाकारला.

**फेर तपास** काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

स्वाक्षरीत/-

**( आर.डी. वाबळे )**
अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
अहमदपूर.

दिनांक -०८.०४.२०२६